


Subscribe इयत्ता – पाचवी (27 जुलै) माझा अभ्यास Subscribe

# शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

# दिवस सत्तावीस: ☞






टेस्ट सोडवा

## मुंग्यांच्या जगात

पाठ वाचा व समजून घ्या.

स्वतःचे आणि वसाहतीचे संरक्षण करण्यासाठी मुंग्या नेहमी तत्पर असतात. स्वतःच्या किंवा वसाहतीच्या संरक्षणासाठी काही मुंग्या कडकडून चावा घेतात. काही मुंग्या विषारी दंश करतात, तर काही विशिष्ट आम्लाचा फवारा शत्रूवर सोडतात. नकळत एखाद्या वेळेला लाल मुंग्यांच्या वसाहतीवर पाय पडल्यास काय होते ते तुम्हांला सांगण्याची गरज नाही. वसाहतीवर संकट आणणाऱ्या मोठ्या शत्रूला सगळ्या मुंग्यांनी मिळून चावा घेतला, की त्याला तेथून पळ काढावाच लागतो. काही जातींच्या मुंग्यांना दंश करण्यासाठी सुईसारखी योजना केलेली असते. दंश करताच प्राण्याच्या शरीरात विष सोडले जाते. या विषाचा मोठ्या प्राण्यांवर फारसा प्रभाव जाणवत नाही; परंतु अशा अनेक दंशांपासून होणारा दाह त्या प्राण्याला वसाहतीपासून दूर करण्यात यशस्वी ठरतो. या मुंग्यांचा प्रभाव हाणून पाडणारे त्यांचे बरेच शत्रूदेखील आहेत. अर्थातच निसर्गाने निर्माण केलेल्या अन्नसाखळीचा हा एक भागच आहे, हे आपल्याला कसे विसरून चालेल!

अशा या उद्यमशील, शिस्तबद्ध, सामाजिक जीवन जगणाऱ्या मुंग्यांकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे.

– प्रकाश किसन नवाळे

**शब्दार्थ :** **वसाहत** – राहण्याचे ठिकाण, वस्ती. **गंध** – वास. **माग काढणे** – शोध घेणे. **सुगावा लागणे** – शोध लागणे. **तत्पर असणे** – तयार असणे. **पळ काढणे** – निघून जाणे. **दाह होणे** –आग होणे. **हाणून पाडणे** – निष्फळ करणे, खोडून काढणे. **उद्यमशील** – उद्योगप्रिय.

### स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कीटकांमध्ये मुंगीचे नाव सर्वप्रथम का घेतले जाते?

(आ) मुंग्या गंधकण केव्हा सोडतात?

(इ) मुंग्या नेहमी कशासाठी तत्पर असतात?

**प्र. २. मुंग्या स्वतःचे व वसाहतीचे संरक्षण कसे करतात?**

**प्र. ३. वाक्यात उपयोग करा.**

माग काढणे, सावध करणे, फवारा सोडणे, तत्पर असणे, पळ काढणे, दाह होणे, हाणून पाडणे.

**प्र. ४. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) माणसांना दंश करणारे मुंग्यांप्रमाणे दुसरे कीटक कोणते? त्यांच्या दंशाचा माणसांवर काय परिणाम होतो?

(आ) 'अन्नसाखळी' म्हणजे काय? शिक्षकांकडून माहिती मिळवा व तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) मुंग्यांप्रमाणे अन्नसाठा करणारे आणि अन्नसाठा न करणारे कीटक व प्राणी यांची नावे लिहा. ग्रंथालयात जाऊन पुस्तकांतून माहिती मिळवा.

**प्र. ५. या पाठात आलेले मुंग्यांचे कोणते गुण किंवा वैशिष्ट्ये तुम्हांला आवडली ते सांगा.**

**प्र. ६. मुंग्यांवरील कविता शोधा व वर्गात म्हणून दाखवा.**

**प्र. ७. 'मुंगी' या शब्दाची वेगवेगळी रूपे या पाठात आलेली आहेत. ती शोधा व लिहा. याप्रमाणे एखाद्या शब्दाची वेगवेगळी रूपे लिहा.**

# सराव

3. बेरीज व वजाबाकी

टेस्ट सोडवा

खालील वजाबाकी करा.

उदा. (1)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 0 | 5 | 8 | 2 | 5 |
| – | | 9 | 8 | 7 | 6 |
| 1 | 1 | 1 | 1 | 1 | |
| 3 | 9 | 5 | 9 | 4 | 9 |

उदा. (2)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 2 | 0 | 2 | 1 | 1 |
| – | 2 | 1 | 8 | 9 | 5 | 0 |
| | | 1 | 1 | 1 | | |
| 2 | 3 | 0 | 1 | 2 | 6 | 1 |

## उदाहरणसंग्रह 11

वजाबाकी करा.

(1) 8,57,513 – 4,82,256 (2) 13,17,519 – 10,07,423 (3) 68,34,501 – 23,57,823

(4) 45,43,827 – 12,05,938 (5) 70,12,345 – 28,64,547 (6) 38,01,213 – 37,54,648

पुढील शाब्दिक उदाहरण अभ्यासा.

एका शहराची लोकसंख्या 2001 साली 21,43,567 होती. ती 2011 साली 28,09,878 झाली, तर लोकसंख्येत किती वाढ झाली ?

```
  2809878
– 2143567
  0666311
```

शहराची लोकसंख्या 6,66,311 ने वाढली.

## उदाहरणसंग्रह 12

1. प्रथमेशला 27,450 रुपयांचा एक लॅपटॉप घ्यायचा आहे. त्याच्याजवळ 22,975 रुपये आहेत, तर लॅपटॉप घेण्यासाठी त्याला आणखी किती रक्कम लागेल ?
2. एका वर्षी एका कंपनीने 44,730 स्कूटर्स तयार केल्या. दुसऱ्या वर्षी 43,150 स्कूटर्स तयार केल्या, तर कंपनीने पहिल्या वर्षी किती जास्त स्कूटर्स तयार केल्या ?
3. एका शहरात पुरुषांची संख्या 16,37,856 असून स्त्रियांची संख्या 16,52,978 आहे, तर स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येपेक्षा किती जास्त आहे ?
4. एका संस्थेने सामाजिक उपक्रमासाठी 25,00,000 रुपये जमा करण्याचे ठरवले होते. लोकवर्गणी व इतर मदतीतून संस्थेला 26,57,340 रुपये मिळाले, तर संस्थेला ठरवल्यापेक्षा किती रक्कम जास्त मिळाली ?
5. 23,849 व 27,056 या संख्या घेऊन वजाबाकीचे उदाहरण तयार करा व सोडवा.

### मिश्र उदाहरणे

पुढे सोडवून दिलेली दोन उदाहरणे अभ्यासा.

**उदा. (1)** 4,13,758 + 2,09,542 – 5,16,304

```
  413758      623300
+ 209542    – 516304
  623300      106996
```

4,13,758 + 2,09,542 – 5,16,304 = 1,06,996

**उदा. (2)** 345678 – 162054 + 600127

```
  345678      183624
– 162054    + 600127
  183624      783751
```

345678 – 162054 + 600127 = 7,83,751

## subtract.

Revision

**Example (1)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 0 | 5 | 8 | 2 | 5 |
| – | | 9 | 8 | 7 | 6 |
| 1 | 1 | 1 | 1 | 1 | |
| 3 | 9 | 5 | 9 | 4 | 9 |

**Example (2)**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 2 | 0 | 2 | 1 | 1 |
| – | 2 | 1 | 8 | 9 | 5 | 0 |
| | | 1 | 1 | 1 | | |
| 2 | 3 | 0 | 1 | 2 | 6 | 1 |

### Problem Set 11

Subtract :

(1) 8,57,513 – 4,82,256 (2) 13,17,519 – 10,07,423 (3) 68,34,501 – 23,57,823

(4) 45,43,827 – 12,05,938 (5) 70,12,345 – 28,64,547 (6) 38,01,213 – 37,54,648

Study the following word problem.

In 2001, the population of a city was 21,43,567. In 2011, it was 28,09,878. By how much did the population grow?

$$\begin{array}{r} 2809878 \\ -\ 2143567 \\ \hline 0666311 \end{array}$$

The population grew by 6,66,311.

### Problem Set 12

1. Prathamesh wants to buy a laptop worth 27,450 rupees. He has 22,975 rupees. What is the amount he still needs to be able to buy the laptop?
2. A company produced 44,730 scooters in a certain year and 43,150 in the next. How many more scooters did they produce in the previous year?
3. In a certain city, the number of men is 16,37,856 and the number of women is 16,52,978. By how many does the number of women exceed the number of men?
4. An organization decided to collect 25,00,000 rupees for a certain project. They collected 26,57,340 through donations and other kinds of aid. By how much did they exceed their target?
5. Use the numbers 23,849 and 27,056 to make a subtraction problem. Solve the problem.

### Mixed examples

Study the following solved examples.

**Example (1)** 4,13,758 + 2,09,542 – 5,16,304

4,13,758 + 2,09,542 – 5,16,304 = 1,06,996

$$\begin{array}{r} 413758 \\ +\ 209542 \\ \hline 623300 \end{array} \qquad \begin{array}{r} 623300 \\ -\ 516304 \\ \hline 106996 \end{array}$$

**Example (2)** 345678 – 162054 + 600127

345678 – 162054 + 600127 = 7,83,751

$$\begin{array}{r} 345678 \\ -\ 162054 \\ \hline 183624 \end{array} \qquad \begin{array}{r} 183624 \\ +\ 600127 \\ \hline 783751 \end{array}$$

टेस्ट सोडवा

## listen and understand.




1. Read each word in the following table at a glance. या तक्त्यातील प्रत्येक शब्द एका दृष्टिक्षेपात वाचा. O4

| | | | | |
|---|---|---|---|---|
| a | all | the | an | their |
| and | them | any | who | me |
| my | no | now | your | but |
| where | her | every | by | here |
| him | his | if | how | many |
| with | one | what | us | to |
| this | there | some | that | only |
| of | our | without | then | when |

2. Prepare a card for each of these words and put the words in alphabetical order. या प्रत्येक शब्दाचे एकेक कार्ड तयार करून शब्द वर्णानुक्रमाने लावा. ('a' ते 'z') W2 P1
3. Find rhyming words from the chart. या तक्त्यातील यमक जुळणारे शब्द शोधा. O10
4. From the chart, find the words that begin with 't'/with 'w'. या तक्त्यातील 't' ने / 'w' ने सुरू होणारे शब्द शोधा. O10
5. From the chart, find the words that end with 'o'/with 'y'. या तक्त्यातील 'o' ने / 'y' ने शेवट होणारे शब्द शोधा. O10 W4

पाठ वाचा व समजून घ्या.

# ३. पृथ्वी आणि जीवसृष्टी

टेस्ट सोडवा

## आपण काय शिकलो ?

- पृथ्वीचे बाहेरील कठीण कवच व त्याखालील थराचा काही भाग यांच्या एकत्रित आवरणाला शिलावरण म्हणतात.
- पृथ्वीच्या पृष्ठभागाचा सुमारे $\frac{१}{३}$ एवढा भाग जमिनीने तर सुमारे $\frac{२}{३}$ एवढा भाग पाण्याने व्यापला आहे.
- जमिनीवरील पाणी व बर्फ, भूजल आणि हवेतील बाष्प यांचा समावेश पृथ्वीच्या जलावरणात होतो.
- पृथ्वीभोवतालच्या हवेच्या आवरणाला वातावरण म्हणतात.
- पृथ्वीवरील जलचक्र सतत सुरू असते.
- स्थितांबरातील ओझोन वायू सूर्यापासून येणारे घातक अतिनील किरण शोषून घेतो, त्यामुळे पृथ्वीवरील सजीवांचे रक्षण होते.
- वातावरण, शिलावरण आणि जलावरण या तिन्ही आवरणांत सजीवांचे अस्तित्व असते. सजीव व त्यांनी व्यापलेल्या या भागांस एकत्रितपणे जीवावरण म्हणतात.

## स्वाध्याय

१. **काय करावे बरे?**
उन्हात फिरले की त्वचेवर चट्टे पडतात.

२. **जरा डोके चालवा.**
(अ) सूक्ष्मजीव महत्त्वाचे का आहेत?
(आ) समुद्रातून मिळणारे अन्न, यावर विचार करा, माहिती मिळवा आणि दहा ओळी लिहा.

३. **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**
(अ) ढग कशाचे बनलेले असतात?
(आ) जीवावरण कशाला म्हणतात?
(इ) तुमच्या परिसरात असणाऱ्या विविध भूरूपांची यादी करा. त्यांतील कोणत्याही दोन भूरूपांचे वर्णन करा.

४. **पुढील दोन वाक्यांतील भूरूपदर्शक शब्दांना अधोरेखित करा.**
(अ) अमीनचे घर डोंगराच्या पायथ्याशी आहे.
(आ) रिया पठारी भागात राहते.

५. **माहिती लिहा.**
(अ) बाष्पीभवन (आ) संघनन (इ) जलचक्र

६. **कोणतीही दोन उदाहरणे लिहा.**
(अ) हवामानाशी संबंध असलेल्या घडामोडी.
(आ) पाणी उपलब्ध असणारी ठिकाणे.

७. **जलचक्राची नामनिर्देशित आकृती काढा.**

**उपक्रम**
वातावरणाच्या थरांविषयी अधिक माहिती मिळवा.

* * *

5SX11C

## २. इतिहास आणि कालसंकल्पना

टेस्ट सोडवा

वाचा व समजून घ्या.



विलार्ड लिबी

जन्म – १९०८ मृत्यू – १९८०





**कालनिश्चितीच्या पद्धती :** कर्ब १४ हा वायू सर्व सजीवांच्या शरीरात असतो. सजीवांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अवशेषांमधील कर्ब १४ चे प्रमाण घटत जाते. प्रागैतिहासिक काळातील लाकूड, कोळसा, हाडे, जीवाश्म इ. वस्तूंमध्ये हा वायू घटत जाऊन आता तो किती प्रमाणात शिल्लक आहे, हे प्रयोगशाळेत मोजले जाते. शिल्लक वायूच्या आधारे त्या वस्तूचे वय मोजणे शक्य होते. एखाद्या वस्तूचे वय ठरवण्याच्या या वैज्ञानिक पद्धतीस 'कर्ब १४ पद्धती' म्हटले जाते. कालमापनाच्या इतर अनेक पद्धती आहेत. मात्र 'कर्ब १४' ही पद्धत अधिक उपयोगात आणली जाणारी पद्धत आहे. या आणि इतर कालमापन पद्धतींच्या आधारे वस्तूंचा काळ निश्चित झाला, की त्या वस्तू ज्या संस्कृतीच्या लोकांनी निर्माण केल्या, त्या संस्कृतीचा काळ एकरेखिक कालरेषेवर दाखवता येतो.

झाडाची वाढ होत असताना झाडाच्या खोडाचे एक-एक वलय दरवर्षी वाढत जाते. ती वलये मोजली असता झाडाचे वय मोजता येते. लाकडी वस्तूचे वय मोजण्यासही त्याची मदत होते. या पद्धतीला 'काष्ठवलय कालमापन पद्धती' म्हणतात.

● **देखो, सुनो और बनाओ :**

## ७. बधाई कार्ड



**सामग्री** – कागज, पुरानी साड़ी की लेस, टिकलियाँ, रंगीन काँच के छोटे-छोटे टुकड़े, कैंची, गोंद ।

**कृति** – बधाई कार्ड के लिए आवश्यक आकार में कागज को काटो । पुरानी साड़ी की लेस को काट कर चारों किनारों में चिपकाओ । कार्ड को आकर्षक बनाने के लिए टिकलियों और काँच के छोटे-छोटे टुकड़ों को उचित जगहों पर चिपकाओ । स्केच पेन से विविध रंगों की सजावट करो । बधाई का संदेश देखकर लिखो ।




❑ विद्यार्थियों को उनके मित्र/सहेली के जन्मदिन एवं अन्य अवसरों पर हाथ से बनाकर बधाई कार्ड भेजने के लिए कहें । बड़ों के लिए प्रणाम, नमस्कार, नमस्ते और छोटों के लिए आशीष, स्नेह, प्यार जैसे शब्दों से विद्यार्थियों को परिचित कराएँ ।

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| पाचवी मराठी | पाचवी गणित | सेमी गणित | पाचवी इंग्रजी | पाचवी प.अ-1 | पाचवी प.अ-2 | हिंदी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे    वेब स्त्रोत-'ई-बालभारती'    सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in